आरोग्य सेवक (महिला) गट क या
संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या व
नेमणुका प्रशासकिय बदल्या सन २०२५
(पेसा क्षेत्र वगळून उर्वरित तालुक्यांत समतोल साधण्यासाठी)

अहिल्यानगर जिल्हा परिषद
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र आरोग्य/आस्था-४/४००/२०२५
अहिल्यानगर दिनांक १९/०५/२०२५

वाचा:- १.शासन ग्राम विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे कडिल निर्णय क्र जिपब-४१४ /प्र क्र ११२/आ-१४,दि.१५ मे २०१४.
२.महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडिल शासन शुध्दीपत्रक क्र पत्र क्र जिपब ४१४/ प्र.क्रं.११२/आस्था १४,दिनांक ०२ जुलै २०१४
३.महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे कडिल पुरक पत्र क्र जिपब-८१७/ प्र क्र.२२८/आ-१४,दि.०७ मार्च २०१९
४.महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग,यांचेकडील पत्र क्रं.संकीर्ण २०२२/प्रक्र२२६/ आस्था-१४, दि. ११ मे २०२२
५.मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.)जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/आस्था-३/१२२२/३३१/२०२५ दि.२६/०३/२०२५
६. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे कडिल निर्णय क्र.जिपब-४८१७/प्र क्र २२८/आ-१४ दि.२८ मार्च २०२५.
७.जिल्हा परिषद सर्वसाधारण बदल्यांचे इतिवृत्त दि.१५/०५/२०२५

शासनाकडील संदर्भ क्रमांक १ च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार, संदर्भ क्र.२ व ३ अन्वयेचे शुध्दीपत्रक व तदअनुषंगिक निर्णयातील तरतुदींनुसार, तसेच संदर्भ क्रमांक ४ च्या शासन पत्रान्वये बदल्या करण्यास दिलेल्या परवानगीनुसार जिल्हा परिषदे अंतर्गत आरोग्य विभागाच्या अधिनिस्त कार्यरत असलेल्या आरोग्य सेवक (महिला) गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष समुदेशनाने त्यांच्या नावापुढील रकाना क्रमांक ३ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणापासुन रकाना क्रमांक ४ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी प्रशासकीय बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

## पेसा क्षेत्र वगळता उर्वरित तालुक्यांत समतोल साधण्यासाठी केलेल्या प्रशासकीय बदल्या

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | बदलीपूर्वीचे ठिकाण | | | बदली नंतरचे ठिकाण | | | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उपकेंद्र | प्राआकेंद्र | तालुका | उपकेंद्र | प्राआकेंद्र | तालुका | |
| १ | २ | ३ | | | ४ | | | ५ |
| १ | श्रीम आदमाने उषा रामदास | खारेकर्जुने | टाकळीखातगाव | नगर | वारी | वारी | कोपरगाव | प्रशासकीय |
| २ | श्रीम कोके सुरेखा दत्तात्रय | वाळुंज | रुईछत्तीसी | नगर | पिंपळगाव | कोतुळ | अकोले | प्रशासकीय |
| ३ | श्रीम बारगजे तारा पांडुरंग | राक्षी | चापडगाव | शेवगाव | ब्राम्हणगाव | टाकळी ब्राम्हणगाव | कोपरगाव | प्रशासकीय |
| ४ | श्रीम तुपे सरला विठठल | दुलेचांदगाव | पागोरी पिंपळगाव | पाथर्डी | गर्दणी | म्हाळादेवी | अकोले | प्रशासकीय |
| ५ | श्रीम बढे आशाबाई कुंडलीक | वडुले खु | ढोरजळगाव | शेवगाव | गोधेगाव | दहिगाव बोलका | कोपरगाव | प्रशासकीय |
| ६ | श्रीम लोखंडे राणी पंडीत | लाडजळगाव | हातगाव | शेवगाव | जवळके | पोहेगाव | कोपरगाव | प्रशासकीय |
| ७ | श्रीम खेडकर अंबिका महादेव | तोंडोळी | पागोरी पिंपळगाव | पाथर्डी | चैतन्यपूर | ब्राम्हणवाडा | अकोले | प्रशासकीय |

वरिल कर्मचा-यांचे बदलीचे आदेश खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

१) आदेशात नमुद कर्मचा-यांस बदलीचे ठिकाणी हजर होणेकामी दि.३१/०५/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे.

२) संदर्भ क्रमांक १ मधील प्रकरण-१ मुददा क्र.७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन **दिनांक ०१/०६/२०२५** नंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत अन्यथा पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजु न झाल्यास, अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणुन गणला जाईल. तसेच मुददा क्र. ८ मध्ये नमुद केलेनुसार बदली ही संपुर्ण प्रशासकिय बाब असल्याने कोणत्याही कर्मचाऱ्यांने राजकिय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक)नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणुन शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

३) संबंधित कार्यालय प्रमुख यांनी बदली करण्यात आलेल्या कर्मचा-यांना त्यांचेकडील कार्यभार सोपविणेबाबत पर्यायी व्यवस्था करुन संबंधितांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकरीता कार्यमुक्त करावे.

४) सदर बदली प्रशासकीय कारणास्तव केलेली असल्याने संबंधितांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र.२०२५०५१९१००१७६ असा आहे.

स्वाक्षरीत xxxx
(आशिष येरेकर,भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

सर्व संबंधित आरोग्य सेवक (महिला)

द्वारा व प्रत - वैदयकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र ----------------तालुका ----------- जिल्हा अहिल्यानगर

२/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यांस बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीताचे वेतन **दि. ०१/०६/२०२५** नंतर अदा करु नये, बदली झालेल्या कर्मचाऱ्यांस हजर करुन घेण्यात यावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रतः-गट विकास अधिकारी पंचायत समिती ---------------------------
प्रतः-तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती ---------------------------
प्रत -मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत –जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत- निवडनस्ती

(डॉ.बापूसाहेब नागरगोजे)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्थळ प्रतिवर मा.मु का अ जि प अ नगर यांची स्वाक्षरी असे